# गेल्या ४ वर्षात विविध क्षेत्रात महाराष्ट्राची चौफेर प्रगती
## - मुख्यमंत्री

लोकशाही आघाडी शासनाच्या गेल्या ४ वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्राने विविध क्षेत्रात आपला दबदबा कामय ठेवला असून गृहनिर्माण, पायाभूत सुविधा, दळणवळण, थेट परदेशी गुंतवणूक, औद्योगिक विकास, जलसिंचन, मागासवर्गियांचे कल्याण, अल्पसंख्याक विकास यासारख्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आघाडी शासनाच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त दिली आहे.

मुख्यमंत्री आपल्या प्रतिक्रियेत म्हणतात, गेल्या चार वर्षात २६ जुलैची मुंबईतील प्रलंयकारी अतिवृष्टी, सलग दोन वर्ष महाराष्ट्रात आलेला महापूर, लोकल मधील बॉम्बस्फोट, कोरडा दुष्काळ, विविध पिकांचे झालेले नुकसान, बर्डफ्ल्यू, शेतकऱ्यांच्या आत्महत्या यासारख्या संकटाचा सामना सरकारला करावा लागला. पण या सर्व संकटावर कौशल्यपूर्वक मात करत शासनाने महाराष्ट्राच्या विकासाला गती दिली आहे.

### गुंतवणुकीत आघाडी

गेल्या ४ वर्षात ९५ विशाल प्रकल्पांमध्ये १ लाख ३५ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाले. देशात सर्वाधिक थेट परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात आली. यंदा सिंचनासाठी ७ हजार कोटीची तरतूद प्रथमच केली गेली. यामुळे पुढील २ वर्षात मराठवाडा व विदर्भातील सिंचनाचा अनुशेष पूर्ण दूर होईल. सर्वसामान्यांना परवडतील अशी १० लाख घरे बांधण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबवायला सुरुवात झाली. सध्या लाख ते दीड लाख घरे बांधकामाच्या विविध टप्प्यांवर आहेत. सफाई कामगारांसाठी ९० हजार घरे मोफत बांधून दिली जातील. भाडेतत्वावरील ५ लाख घरे बांधण्याची मोठी योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात झालेल्या औद्योगिक गुंतवणुकीमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा २० लाख रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. सध्या पुण्यात १५ हजार अभियंत्यांची कमतरता भासत आहे. रोजगाराच्या विपूल संधी निर्माण होणार असल्याने एकट्या नागपूरमध्ये यंदा ३० अभियांत्रिकी महाविद्यालये निघाली आहेत.

### सर्वाधिक एसईझेड महाराष्ट्रात

राज्यात १३६ विशेष आर्थिक क्षेत्रांना (एसईझेड) मान्यता मिळाली असून त्यात १ लाख २५ हजार कोटीची गुंतवणूक व २० लाख रोजगाराची निर्मिती होणार आहे. एखाद दुसरा अपवाद वगळता एसईझेडसाठी जमीन संपादन करण्याची समस्या

महाराष्ट्रात नाही. शेतकरी व जमीन धारकांना सर्वोत्कृष्ट पुनर्वसन पॅकेज मिळावे यासाठी राज्य शासनाचा आग्रह आहे. सिंचनाखालील जमीन एसईझेडसाठी ताब्यात घेतली जाणार नाही. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले जाणार आहे.

## मागासवर्गियांच्या कल्याणाला प्राधान्य

अनुसूचित जाती व जमातीच्या विविध विकास योजना राबविण्यासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या तुलनेत तरतूद करण्यात आली. यंदा ही तरतूद ४२७२ कोटी रुपयांची असून त्यातून विविध विकास कामे मार्गी लागली आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण देणाऱ्या खाजगी संस्थेत प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जाती व जमातींच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी, परीक्षा फी १०० टक्के भरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांची ५० टक्के फी शासन भरत आहे.

## अल्पसंख्याकांचे हित

अल्पसंख्याकांच्या हिताच्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतीगृहे, रोजगार व स्वयंरोजगाराला चालना देणाऱ्या आयटीआयची स्थापना अशा बाबींना प्राधान्य दिले जाणार आहे. शासकीय गृहनिर्माण योजनेमध्ये अल्पसंख्याकांसाठी काही जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून स्वंयरोजगारासाठी कर्ज मिळविण्यासाठी शैक्षणिक, वयोमर्यादा आणि उत्पन्नाच्या अटी शिथिल करण्यात आल्या आहेत.

## नगरांचे पुर्ननिर्माण व पायाभूत सुविधा

जवाहरलाल नेहरू नागरी पुर्ननिर्माण योजनेअंतर्गत देशात सर्वाधिक ५१ प्रकल्पांना ७५२८ कोटी रुपयांचा निधी केंद्राकडून मिळाला आहे. त्याद्वारे विविध लहान मोठ्या शहरातील पायाभूत सुविधांचा दर्जा व गुणवत्ता वाढीचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

राज्यातील सर्व प्रमुख रस्ते चारपदरी करण्याची योजना राबविण्यात येत असून यामुळे दळणवळण व्यवस्था आणखी सक्षम होण्यास सहाय्य होणार आहे. नुकतीच नांदेड - लातूर हवाई सेवा सुरु झाली आहे. नाशिक, कोल्हापूर, सोलापूर या शहरांमध्ये नियमित विमानसेवा लवकरच सुरु होतील.

नागपूर कार्गो हबचे काम मार्गी लागले आहे. पुणे आणि नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार आहेत. मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नूतनीकरण व विस्तारीकरण झपाट्याने सुरु आहे. मुंबईत जलवाहतूक सुरु करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

## शेतकऱ्यांना ६ टक्के दराने कर्ज सवलत

शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले असून ६ टक्के व्याजदराने पीक कर्ज देण्यात येत आहे. वेळेवर कर्ज भरल्यास आणखी २ ते ४ टक्के सूट दिली जाते. विविध पिकांच्या नुकसान भरपाईपोटी साधारणत: १५ शे कोटी रुपयांचे अर्थसहाय्य दिले आहे. कृषी क्षेत्राचा दर ४ टक्के करण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्याचा कृषी विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यात पंतप्रधान पॅकेज व राज्य शासनाच्या पॅकेजची अंमलबजावणी ९० टक्क्यांच्यावर झाली असून त्याचे दृष्यपरिणाम आता दिसू लागले आहेत. कृषिविषयक कारणांसाठी होणाऱ्या आत्महत्यांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. केंद्राच्या कर्ज माफीचा फायदा ३५ लाख शेतकऱ्यांना मिळाला आहे. ज्यांनी वेळेवेर कर्ज परतफेड केली त्यांना सुध्दा दिलासा देण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत.

## महिला स्वयंसहाय्यता गटांना ४ टक्के दराने कर्ज

महिला स्वयंसहाय्यता गटांना ४ टक्के दराने कर्ज देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेऊन महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दिशेने महत्वाचे पाऊन टाकले आहे. क्रीडा विकासासाठी दरवर्षी १०० कोटी रुपये, खेळाडुंना शासकीय नोकरीत ५ टक्के आरक्ष्ण, स्वातंत्र्य सैनिकांच्या मानधनात दरमहा ४ हजार रुपयांवरुन ६ हजार रुपये अशी वाढ, १ लाख ३९ हजार मागासवर्गीयांची शासकीय सेवेत भरती, ९० हजार मागासवर्गीय अधिकारी कर्मचाऱ्यांना पदोन्नती, संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी निराधार व भूमिहिन शेतमजूर महिला अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानात दरमहा २५० रुपयांवरुन ५०० ते ७५० रुपयांपर्यंत वाढ.

तीर्थक्षेत्र विकासाच्या व्यापक कार्यक्रमांतर्गत देहू, आळंदी - पंढरपूरचा एकात्मिक पध्दतीने विकास, तुळजापूर तीर्थक्षेत्र विकासासाठी प्राधिकरणाची स्थापना व ३०० कोटी रुपयांची तरतूद आदी महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

## मुंबईच्या विकासकामांना गती

मुंबईला आंतरराष्ट्रीय शहर करण्यासाठी सध्या ३५ हजार कोटीच्या विविध पायाभूत व परिवहन विकासाच्या योजना मार्गी लागल्या आहेत. मेट्रो रेल टप्पा-१ चे काम सुरु झाले आहे. मेट्रो रेल टप्पा-२ मान्यता मिळाली आहे. मोनो रेलच्या कामाला लवकरच शुभारंभ होणार आहे. चर्चगेट ते विरार एलिव्हेटेड रेल्वेला ही मान्यता मिळाली आहे. ५० स्कायवॉक बांधल्या जात आहेत. १६ उड्डाणपुले होत आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी नव्या लोकल रेल्वे येण्यास प्रारंभ झाला आहे.

गेल्या चार वर्षात २००० अतिरिक्त मेगॅवॅट विजेची निर्मिती झाली आहे. परळी पारस येथील वीज निर्मिती केंद्र सुरु झाली आहेत. दाभोळ प्रकल्पातून १५ शे ते १६ शे मेगॅवॅट वीज युनिट पुढील दोन तीन वर्षात मिळण्याची शक्यता आहे. २०१२ पर्यंत राज्य भारनियमन मुक्त होण्यासाठी शासकीय खाजगी व अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.